## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/१०/२०१७

**१) संगनमत करुन घराचे जागेच्या मोजनीच्या कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन घराचे जागेच्या मोजनी वरुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. योगिता हेमंत माकडे वय ३० रा. कोसरा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**२) एसटी बस हयगयीने चालवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे १२.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रभासकुमार रामसुंदर मिश्रा वय ४५ वर्ष, रा. तात्या टोपे वार्ड भंडारा हे नवदुर्गा विसर्जनाचे मिरवणुकीत जात असता यातील आरोपी बस चालकाने त्याचे ताब्यातील बस हयगयीने चालवुन फिर्यादीचे अंगावर आणुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने तसेच त्याला हटकले असता फिर्यादीस एसटीचे लिव्हर पाण्याने मारपीट केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३२३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाणे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) जंगली डुक्कर च्या धडकेत मोटार सायकल स्वाराचा मृत्यु. :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील मृतक रविंद्र युवराज साठवणे वय ३२ वर्ष रा. कोका हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६/एम ९६७८ नी कोका वरून खडकी येथे राडाने जात असतांनी, अचानक रस्त्यावर जगंली प्राणी डुक्कर हा आडवा आल्याने, धडक लागुन पडुन डोक्याला गंभिर मार लागुन मरण पावला असल्याने, फिर्यादी देवदास रतीराम साठवणे वय ३६ वर्ष रा. कोका यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे करडी हे करीत आहेत

**४) सर्पदंशाने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०१/१०/२०१७ चे ०७.१० वाजता दरम्यान यातील मृतक संजय तुकाराम मानापुरे वय ३२ वर्ष, रा. ढोरवाडा याचे डावे पायाला साप चावल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे दिनांक ३०/०९/२०१७ ला भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत

५) इसम मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद :—

दिनांक ०१/१०/२०१७ चे १७.१० वाजता दरम्यान यातील मृतक प्रवीण सुबीराज ठवकर वय ५० वर्ष, हा नवीन बसस्टॉप जवळील कारेमोरे कॉम्प्लेक्स जवळ मृत अवस्थेत पडलेला मिळुन आल्याने फिर्यादी हेमराज शंकर ठवकर वय २९ वर्ष, रा. खापा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेसरे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०१/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९५ केसेस करण्यात आले आहे.

02.10

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता